# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १८/०४/२०१८**

आज बुधवार दि. १८/०४/२०१८ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०१ दि. ०७/०४/२०१८ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | **डिम्पल विनोद मेहता** | **महापौर** |
| २) | **चंद्रकांत सिताराम वैती** | **उपमहापौर** |
| ३) | **धृवकिशोर मन्साराम पाटील** | **सभापती, स्थायी सामिती** |
| ४) | **पाटील रोहिदास शंकर** | **सभागृह नेता** |
| ५) | **भोईर राजू यशवंत** | **विरोधी पक्षनेता** |
| ६) | **भोईर सुनिता शशिकांत** | **सदस्या** |
| ७) | **शाह रिटा सुभाष** | **सदस्या** |
| ८) | **पांडेय पंकज सूर्यमणि** | **सदस्य** |
| ९) | **गोहिल शानू जोरावर सिंह** | **सदस्या** |
| १०) | **सिंह मदन उदितनारायण** | **सदस्य** |
| ११) | **शेट्टी गणेश गोपाळ** | **सदस्य** |
| १२) | **ढवण निलम हरीश्चंद्र** | **सदस्या** |
| १३) | **कदम अर्चना अरुण** | **सदस्या** |
| १४) | **नलावडे दिनेश दगडु** | **सदस्य** |
| १५) | **भोईर गणेश गजानन** | **सदस्य** |
| १६) | **पाटील प्रभात प्रकाश** | **सदस्या** |
| १७) | **गुप्ता कुसुम संतोष** | **सदस्या** |
| १८) | **पाटील धनेश परशुराम** | **सदस्य** |
| १९) | **रावल मेघना दिपक** | **सदस्या** |
| २०) | **शाह राकेश रतिशचंद्र** | **सदस्य** |
| २१) | **जैन गीता भरत** | **सदस्या** |
| २२) | **जैन सुनिता रमेश** | **सदस्या** |
| २३) | **जैन राजेंद्र भवरलाल** | **सदस्य** |
| २४) | **रॉड्रीकस मोरस जोसेफ** | **सदस्य** |
| २५) | **भूप्ताणी रक्षा सतीश (शाह)** | **सदस्या** |
| २६) | **मोकाशी दिपाली आनंदराव** | **सदस्या** |
| २७) | **व्यास रवि वासुदेव** | **सदस्य** |
| २८) | **परेरा कॅटलीन एन्थोनी** | **सदस्या** |
| २९) | **रकवी वैशाली गजेंद्र** | **सदस्य** |
| ३०) | **अग्रवाल सुशील गोपीकिशन** | **सदस्य** |
| ३१) | **खंडेलवाल सुरेश जगदीश** | **सदस्य** |
| ३२) | **परदेशी गिता हरीश** | **सदस्या** |
| ३३) | **शेख अमजद गफार** | **सदस्य** |

| | | |
|---|---|---|
| ३४) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३५) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ३६) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ३७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| ३८) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ३९) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४०) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४१) | पाटील प्रविण मोरेश्वर | सदस्य |
| ४२) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४३) | गेहलोत हसमुख मोहनलाल | सदस्य |
| ४४) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४५) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४६) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४७) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ४८) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ४९) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५०) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५१) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५२) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५३) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५४) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५५) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५६) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५७) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ५८) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ५९) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६०) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६१) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६२) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६३) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६४) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६५) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६६) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६७) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ६८) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ६९) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७०) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७१) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७२) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७३) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७४) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७५) | **सपार उमा विश्वनाथ** | **सदस्या** |
| ७६) | **अहमद साराह अकरम** | **सदस्या** |
| ७७) | **इनामदार जुबेर अब्दुल्ला** | **सदस्य** |
| ७८) | **शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम** | **सदस्य** |
| ७९) | **भोईर जयेश भानुदास** | **सदस्य** |
| ८०) | **म्हात्रे नयना गजानन** | **सदस्या** |
| ८१) | **म्हात्रे विनोद काशिनाथ** | **सदस्य** |
| ८२) | **गोविंद हेलन जॉर्जी** | **सदस्या** |
| ८३) | **बगाजी शर्मिला विन्सन्ट** | **सदस्या** |
| ८४) | **बांड्या एलायस दुमिंग** | **सदस्य** |

**<u>गैरहजर सदस्य -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | **तिवारी अशोक सूर्यदेव** | **सदस्य** |
| २) | **कांगणे मीना यशवंत** | **सदस्या** |
| ३) | **पाटील वंदना मंगेश** | **सदस्या** |
| ४) | **सिंग श्रीप्रकाश जिलेदार** | **सदस्य** |
| ५) | **पाटील नरेश तुकाराम** | **सदस्य** |
| ६) | **सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन** | **सदस्या** |
| ७) | **शेट्टी अरविंद आनंद** | **सदस्य** |
| ८) | **हसनाळे ज्योत्सना जालींदर** | **सदस्या** |
| ९) | **कासोदारिया अश्विन शामजीभाई** | **सदस्य** |
| १०) | **शाह सीमाबेन कमलेश** | **सदस्या** |

**<u>रजेचा अर्ज -</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | **भानुशाली वर्षा गिरधर** | **सदस्या** |

**मा. महापौर :-**

नमस्कार, उपस्थित सर्व मान्यवर नगरसेवक, नगरसेविकांचे स्वागत करीत आहे. सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी. तसेच सर्वांना अक्षय तृतीयाच्या व बौध्द पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा.

**नगरसचिव :-**

**मिरा भाईंदर महानगपालिकेची मा . महासभा बुधवार दि . १८/०४/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका , स्व. इंदिरा गांधी भवन , मुख्य कार्यालय , तिसरा मजला , छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र . ०१ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.** प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो. ११.२५ मिनिटे झालेली आहेत. श्री. जुबेर इनामदार यांचा प्रश्न आहे. त्यांना लेखी उत्तर मिळाले आहे. त्यांना उत्तर मान्य नसेल तर ते चर्चा करु शकतात.

**जुबेर इनामदार :-**

चर्चा करायची आहे. माझे समाधान झालेले नाही.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब, आपल्याला लेखी उत्तर दिलेले आहे. त्या व्यतिरिक्त काय प्रश्न आहेत का?

**जुबेर इनामदार :-**

लेखी उत्तर दिले तरी त्या विषयावर चर्चा करायचा मला अधिकार आहे.

**मा. उपमहापौर :-**

चर्चा करण्याचा अधिकार आहे. समाधान झाले नसेल तर चर्चा करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, माझे समाधान झालेले नाही. संभ्रम पध्दतीने उत्तर देण्यात आलेले आहे. मा. आयुक्त महोदय, मागील सभेमध्ये रवि डेव्हलपर्स यांनी रस्ता विकसित करुन त्यांना टीडीआर देण्यात आल्याच्या विषयावर मी चर्चा करत होतो. खरोखर पालिकेने त्यांना कार्यादेश दिलेले. पालिकेने अर्थात सार्व. बांधकाम विभागाने जे त्यांना कार्यादेश दिले ते किती योग्य आहेत. कारण तिकडून सुरुवात करायला लागेल की सार्व. बांधकाम विभाग त्यांना कार्यादेश देऊ शकते का? मा. आयुक्तांच्या स्वाक्षरीने दिले तरी देऊ शकते का? आणि देतांना त्यानी हा नगररचना विभागाशी संलग्न विषय रस्ते विकसित करुन त्याच्यातून टी.डी.आर. तयार करुन त्यांना टी.डी.आर. चे सर्टीफिकीट देणे हा एक प्रकार ह्या महापालिकेत घडलेला आहे. प्रथमतः हा विषय शासनाकडे प्रलंबित आहे आणि त्यासाठी दोन वेळा सुरुवातीला पाठवलेला प्रस्ताव दि. २१/११/२०१० रोजी ३७ खाली मायनर मॉडीफिकेशनमध्ये असे रस्ते कोणाला विकसित करायचे असल्यास मनपाच्या दृष्टीने ते हिताचे होते. नियमावलीमध्ये बसत नाही. त्या व्यक्तीवर मनपाने ह्याच महासभेमध्ये ठराव पारित केला सभागृहाने बहुमताने केला आहे आणि तो शासनाकडे मंजूरीसाठी पाठवला होता. त्याचा पाठपुरावा नगररचना विभागाने दि. १६/०९/२०११ रोजी परत केला. मात्र त्याची मंजूरी प्राप्त नाही. तेव्हा ही नव्हती. तरीही ते काम सुरु करण्यात आले. काम सुरु करताना ह्या सभागृहामध्ये आज जे विद्यमान आमदार आहेत त्यांनी ह्या विषयावर लक्षवेधी मांडली त्यांचे भाषण झाले. तेव्हा नगररचनाकार श्री. धनेगावे साहेब होते. त्यांनी ह्या सभागृहामध्ये उत्तर दिले होते. विषय न्यायप्रविष्ठ असल्यामुळे त्याच्यावर भाषण करु शकत नाही. रवि डेव्हलपर्सनी भरपुर अनधिकृत बांधकाम केलेले आहे. ते का थांबवले नाही असा प्रस्ताव आम्ही दिलेला आहे. त्यांनी रस्ते विकसित करायचे, क्रॉंकीटीकरण करायचे त्यातून त्याला टी.डी.आर. उपलब्ध होईल त्या टीडीआर च्या माध्यमातून त्यांनी जेवढे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. त्याला तो नियमित करणार आहे. ऑन द हाऊस ह्या विषयावर मिनिट्स आहेत. धनेगावे साहेबांनी ह्याचे उत्तर दिले होते. प्रश्न विचारणारे आमचे आमदार नरेंद्र मेहता होते. साहेब काम झाले, काम सुरु होते. थर्ड पार्टी ऑडीटर पालिकेचे ऑडीटर हे काय प्रशिक्षण करतात. तांत्रिक प्रशिक्षण करतात की रस्त्या त्यांनी तयार केला आहे तो योग्य आहे नाही अयोग्य आहे दिलेला पध्दतीने केला की नाही केला. तो ऑडीटरने अहवाल दिला केलेले रस्ते हे चांगल्या क्वॉलीटीचे नाही हे पुढचे २५ वर्ष टीकु शकत नाही असा स्पष्ट अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाला दिला. तरी ते काम थांवबले गेले नाही. महापालिकेमध्ये मोठा जोक झाला आहे. मधल्या काळात रवि डेव्हलपर्स नी कोर्टात धाव घेतली. त्याला त्याचा टीडीआर मिळत नव्हता. बरेच आक्षेप लोकांनी उपस्थित केले होते ह्या विषयावर चर्चा होत गेली. सन्मा. आमदार नरेंद्र मेहतांनी तो आक्षेप उपस्थित केला होता. कोर्टातही धाव घेतली. तो विषय न्यायप्रविष्ठ झाला. न्यायप्रविष्ठ झाल्यानंतर न्यायालयाने उत्तर मागीतले, ॲफीडेव्हीट मागीतले हा विषय न्यायप्रविष्ठ असल्यानंतर पालिका स्वतः न्यायालयात गेली होती. त्या काळामध्ये वेब कोर्सनी दिलेला ऑडीट रिपोर्टही न्यायालयाने विचारले. थर्ड पार्टी ऑडीट होते तेव्हा आमचे सन्मा. शहर अभियंता श्री. शिवाजी बारकुंड साहेबांनी ॲफीडेव्हीट सादर केले. ॲफीडेव्हीटमध्ये फक्त आणि फक्त न्यायालयात गेल्यानंतर खरी परिस्थिती न्यायालयासमोर आणणे ही पालिकेची प्रथम भुमिका असायला पाहिजे होती. विकास नियंत्रण नियमावली बोलते तरी काय आम्हाला हा विषय करता येईल किंवा नाही करता येईल कुठेतरी सार्वजनिक बांधकाम विभागाने चुक केली होती. अशाप्रकारे कार्यादेश देता येत नव्हते. ते सगळे बाजुला ठेऊन फक्त ॲफीडेव्हीट कसे दिले दिलेला त्रस्त अहवाल हा थर्ड पार्टी ऑडीटरनी दिलला अहवाल अशाप्रकारे आहे रस्त्याची जी क्वॉलीटी आहे ती चांगली नाही. ॲफीडेव्हीटमध्ये कुठेही उल्लेख केला गेला नाही. नगररचना विभागाने त्याचे काय मत आहे, नियमावली काय बोलत. नियमावलीमध्ये स्पष्ट उल्लेख आहे. ह्याच सभागृहामध्ये तुम्ही विषय आणला आहे रवि डेव्हलपर्स आणि तेच रस्ते कॉंक्रीटीकरण करण्याचा विषय आणला आहे. त्याच्यामध्ये तुम्ही स्वतः उल्लेख करता की ते करता येत नव्हत किंवा करता येत नाही. म्हणून ते अर्धवट सोडण्यात आले ते पालिकेला पूर्ण करावे लागेल. कारण तिकडची लोक आज त्रस्त झाली आहेत. एवढं स्पष्ट असताना शहर अभियंत्यांनी जेव्हा ॲफीडेव्हीट सादर केले तेव्हा त्यांना कोणी थांबवले नव्हते की नगररचना विभागाचा असा अभिप्राय आहे. आमची विकास नियंत्रण नियमावली आम्हाला काय बोलते. आम्हाला रस्ते विकसित करता येतात की नाही करता येत. आपल्याकडे सहा. संचालक उपस्थित आहेत. मला त्यांना एक प्रश्न विचारायचा आहे. तुमची अनुमती असेल तर उत्तर देतील. साहेब, विकास आराखड्यातले जे रस्ते आहेत ते आरक्षण आहेत की नागरीक सुविधा असा कुठे उल्लेख आहे. तुमचा डी.पी. आहे. डी.पी. तल्या

आरक्षणाला नागरीक सुविधा कशी झाली. साहेब, इंटरनली कुठल्याही खाजगी भुखंडातून नागरीक सुविधा क्षेत्र बाजुला करायचे असेल तर त्याच्यातले रस्ते समजा तुम्हाला विकसित करुन त्याच्याकडून घ्यायचे असेल तर ते तुमची ॲमिनिटी हे तर तुमच्या पालिकेचे आराखड्याचे रस्ते आहेत. ते आरक्षणामध्ये नमुद केले आहेत. त्यांचा तुम्ही विकासकर्त्यांना त्याच्यामध्ये जागा जाते. त्याचा टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. मोबदला म्हणून देता.

**नगररचनाकार :-**

प्रपोज रोड आहे म्हणून आपण देतो.

**जुबेर इनामदार :-**

मग विकास आराखड्यातले रस्ते हा आरक्षणाचा भाग झाला. नियमावलीमध्ये स्पष्ट आहे. आरक्षणाचे रस्ते कोणी विकसित करायचे.

**नगररचनाकार :-**

सर डी.पी. प्लानमध्ये जे आहे ते डिसीप्लेटेड आरक्षण आहे. त्याला आरक्षण क्रमांक दिला जातो. हे डी.पी. रोडचे प्रपोजल आहे. परंतु ते आरक्षण म्हणून गणले जात नाही ते सुविधा म्हणून गणले जाते.

**जुबेर इनामदार :-**

हा चर्चेचा भाग आहे मी तुमच्यावर आरोप करत नाही. तुम्ही जे उत्तर द्याल ते पालिकेच्या रेकॉर्डवर येईल. त्या अनुषंगाने आम्हाला पुढे काय करायचे ते करु. साहेब विकास नियंत्रण नियमावली बाब-४, बाब-३ चा ९(४) ट्रान्सपोर्टेशन अर्थात रोड स्टीक म्युनिसिपल काऊन्सील प्रपोज बायडींग द बायझोस्टींग रोड ॲन्ड दी जस्टेड आयदर इन द डेव्हलपर प्लान ऑर बाय द प्रिस्क्रीशन ऑफ रेग्युलर लाईन ऑफ स्ट्रीट अंडर द महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट १९६५ हॅज टू बी डेव्हलप बाय द म्युनिसिपल कॉर्पोरेशन, म्युनिसिपल काऊन्सील हे दुसरे कोणालाच विकसित करता येत नाही. म्हणून हा विषय ३७ खालील मायनर मॉडीफिकेशनसाठी पाठविण्यात आला. असा विषय होता तर मॉडीफिकेशनसाठी हा विषय का गेला?

**नगररचना :-**

मॉडीफिकेशनला जो विषय गेलेला आहे तो विषय गेला होता की हे जे रस्ते डेव्हलप करायचे ते विकासकर्त्यांनी करायचे. त्यांच्या ताब्यात नसतील, त्यांच्या मालकीचे नसतील तर कशाप्रकारे करावे त्यासाठी तो विषय गेला होता. त्यापैकी विकासक आणि कंत्राटदार विकासप्रमुख पत्राची बोली सादर करुन विकसित करण्याचा प्रस्ताव गेला होता आणि आपण म्हंटल्याप्रमाणे अद्याप तो शासनाकडे प्रलंबित आहे.

**जुबेर इनामदार :-**

व्हेन द ऑनर ऑफ द लेसीसी म्हणजे मालक किंवा पट्टाधारक ह्याच्या ऐवजी कोणी नाही. रवि डेव्हलपर्स हा पॉवर ऑफ ॲटर्नी होल्डर आहे. अर्थात कुठे तरी ह्या विषयाचा भ्रष्टाचार झाला मग सार्वजनिक बांधकाम विभागाने अशाप्रकारे कार्यादेश दिले का? त्यानंतर मोठी वस्तु जी आहे त्याचा आधी उल्लेख केला होता की हा विषय विधी विभागाकडे गेला. विधी विभागाने खरोखर स्पष्ट अभिप्राय प्रशासनाला दिला आहे. तो अभिप्राय इतका स्पष्ट होता. आम्हाला अशाप्रकारे कुठलाही कार्यादेश देता येत नाही किंवा त्यांना विकासहक्क प्रमाणपत्र टी.डी.आर. देता येत नाही. कुठल्याही विकासकाला अशाप्रकारचे रस्ते विकसित करायचे असतील तर आपण ३७ खाली मायनर मॉडीफिकेशनचा जो ठराव आहे तो ठराव पाठवला आहे तो मंजूर होऊन आला पाहिजे. हे सगळं स्पष्ट असतानासुध्दा पालिकेने तेच केले जे त्यांना करायचे होते. कारण ह्याच्या मागे माझा स्पष्ट उघडा आरोप आहे. हा भ्रष्ट्राचार नाही तर काय? एका विकासकाला फक्त त्याला फायदा झाला पोहचला म्हणून अशाप्रकारे धोरण राबवण्यात आले. ह्या काळात जेव्हा हा प्रकार घडला तेव्हा त्या परिसरात लोकसंख्यापण कमी होती. रस्ते विकसित व्हायला पाहिजे होते. आम्ही डांबराचे रस्ते सुध्दा करु शकत होतो. राज्यशासन अशाप्रकारे धोरण का आणत नाही का क्लस्टर आणत नाही. डेलीक्रेटेड बिल्डींग आहेत त्याच्यासाठी धोरण आणत नाही. लोकसंख्या वाढली की त्याचा भुर्दंड कुठेतरी ह्या शहरावरच पडणार. ह्या शहराचे इन्फ्रास्ट्रक्चर ह्या शहराची आर्थिक परिस्थिती काय तितकी ताकदवर आहे. अशाप्रकारे लोकवस्ती वाढत गेली. कारण विकासकाला अशाप्रकारे विकास प्रमाणपत्र दिले. तर इमारतीवर इमारत चढवत जाणार त्यांचा तो व्यवसाय आहे. इमारती झाल्या की, लोकसंख्या वाढली त्यांना तुम्हाला पाणी द्यायचे आहे. त्यांना मेडीकल द्यायची आहे. ज्यांना गटर सुविधा, त्यांना बरच काही द्यायचे आहे. त्याची पूर्ण जबाबदारी महापालिकेची, शासनसुध्दा हा विचार करतो ना अशाप्रकारे धोरण निश्चित करताना की आम्हाला करता येईल की नाही करता येणार. केले पाहिजे की नाही केले पाहिजे. ह्याला कुठेतरी शासनाने अंकुश लावलेला आहे. आणि हे सगळे स्पष्ट चित्र

डोळ्यासमोर असताना सुध्दा पालिकेने फक्त भ्रष्टाचारासाठी ही कृती केलेली आहे. विषय न्यायप्रविष्ठ असताना सेटलमेन्ट हा एक प्रकार पालिकेने आदेश दिले की तुम्ही तुमच्या पध्दतीने सेटलमेन्ट होत असेल तर करा. आणि मार्ग काढा. मार्ग काढण्यासाठी स्थायी समितीची मंजुरी लागते. तडजोड आणि समझोता हा शब्द त्याच्यात आहे. त्यासाठी स्थायी समितीची मंजुरी लागते त्यासाठी कारण असे झाले. त्याच्यानंतर वेब कोर्सचा तांत्रिक अहवाल होता की हे काम निकृष्ठ दर्जाचे आहे. टेक्नीकली बरोबर नाही २५ वर्ष टिकणार नाही. त्यांनी आय.आय.टी. निश्चित करुन सर्व अहवाल प्राप्त करुन घेतला त्याला कोणी चॅलेन्ज केले नाही. आय.आय.टी. नी केले ह्याचा अर्थ तो खराच असेल तो बरोबरच आहे. एका बाजूला तुमचा ऑडीटर बोलतो बरोबर नाही. दुसऱ्या बाजूला दुसरा ऑडिटर बोलतो. ऑडिट त्यांनी करुन आणले. त्याच्यात त्यांनी काय तडजोड केली असेल त्याचा कोणी खुलासा केला नाही. त्यांनी दुसर आणले आणि कोर्टात सादर केले की माझे केलेले रस्ते बरोबर आहेत. तांत्रिकदृष्ट्या सक्षम आहेत. २५ वर्ष टिकतील न्यायालयाने तेव्हाही न्यायालयामध्ये कुठेही अजूनही पालिकेने त्यांना स्पष्टीकरण दिले नाही की आम्ही का देत नाही. विकास नियंत्रण नियमावलीत तशी तरतूद नाही. आम्ही मायनर मॉडीफिकेशनसाठी ठराव शासनाकडे पाठवला होता. त्याला अद्याप मंजुरी मिळाली नाही. त्याचप्रकारे न्यायालयाने त्या बेसीसवर एक डायरेक्शन दिले तुम्ही तडजोड करा. तडजोड करण्यासाठी स्थायी समितीकडे यायला लागेल. साहेब आमचे बरेच स्थायी समितीचे सदस्य आज इथे उपस्थित आहेत. ते स्थायी समितीमध्ये होते. मा. महापौर मॅडम तुम्ही नाही, नगररचनाकार नाही, वैती साहेब नाही मी नाही स्वतः आयुक्त नाही. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काय आहे ते तुम्ही आणि मी वाचत नाही. आयुक्त साहेब कोणत्या इमारतीचे प्लान पास करतात ते टिप्पणीवर करतात ह्या अधिकाऱ्याने टिप्पणी दिली बरोबर आहे चुकीचे आहे. त्याच्यामध्ये बदल करणे गरजेचे आहे. त्या आधारावर आयुक्ताला त्याची भुमिका घेतात. स्थायी समितीमध्ये जो गोषवारा दिला त्याच्यामध्ये फक्त न्याय आणि तडजोड करायला सांगितली आहे. का करायला सांगितले त्याचा कुठेच उल्लेख नाही. प्रशासनाने कशाप्रकारे स्थायी समितीचा वापर स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी केला आहे. तडजोडीचा गोषवारा दिला त्याच्यात कुठेच उल्लेख नाही की नियमावलीमध्ये तरतूद आहे की नाही. त्या सन्मा. सदस्यांनी न्यायालयाचा विषय न्यायालयानी डायरेक्शन दिले तुम्हाला करावेच लागेल नाही तर सर्वांना न्यायालयात जायला लागेल. अशा प्रकारे प्रशासनाला बोलायला कोण थांबवत नाही ना. त्या विषयाला गोल मोल करुन स्थायी समितीची मंजुरी घेतली. मंजुरी मिळाली तत्कालीन आयुक्त हांगे साहेबांनी ना विलंब करता २० हजार चौरस मीटर त्यांना विकास हक्क प्रमाणपत्र त्यांना अंडर अगेस्ट ॲमिनिटी देऊन टाकला दिला ठिक आहे. तुम्हाला योग्य वाटले तुम्ही केले. कारण तुम्ही टिपण्याचाच आधारावर केले असेल मा. आयुक्त साहेब आयुक्तांनी खालच्या स्तरावर जाऊन त्यांनी चौकशी केली नसेल. तेवढा वेळ नसतो बरीच काम असतात. त्यानंतर काय झाले देताना तेवढा तरी कमीत कमी नगररचना विभागाने कारण विकासकाचे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नगररचना विभागाचे त्यांनी तिथून तयार केले. त्याच्याकडे परिपूर्ण माहिती आहे. रवि डेव्हलपर्स ह्यांचे कितीतरी बांधकाम आजच्या तारखेत अनधिकृत आहेत. दोन माळ्याचे सी.सी. आहेत, १६ माळे बांधले आहेत. तत्कालीन आयुक्त सुरेश काकाणी त्याच्यावर कारवाई केली. सुरुवात केली परत त्यांनी न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाचे अधिकार आहेत कारण समोर विकास हक्क प्रमाणपत्र दो सार्वजनिक बांधकाम विभागाचा सर्वात मोठा हत्यार घेऊन तो फिरतो. मला तुम्ही पत्र दिले आहे म्हणून मी काही करु शकतो. परत कोर्टात त्याच विषयाला सुरुवात झाली. माझा ह्याच्यामध्ये प्रश्न होता आम्ही त्याला विकासक प्रमाणपत्र दिले २० हजार चौ.मीटर एकूण ६०६२ हजार फुट विकासकाचे प्रमाणपत्र दिले आहे. कोट्यवधी रुपयाचे विकासकचे प्रमाणपत्र आहे. म्हणजे कोट्यवधी रुपये प्रमाणात त्याचा भ्रष्टाचार झाला आहे. तो ही परदेशी पळून जाईल त्याच्या आधी त्याला पकडा. बरीच लोक गेली हा एक जायचा त्याचे नाव उद्या येईल. साहेब त्या व्यक्तींनी त्या बांधकामाला अधिकृत करुन घेतले पाहिजे. जसा तुमच्या प्रभागातला विषय आहे. घेतले पाहिजे कारण त्या लोकांची काय चूक आहे. त्या गोरगरिबांची काय चुक आहे. हा विषय मी माझ्या व्यक्तिगत स्वार्थासाठी आणलेला नाही. त्या दिलेल्या विकासकाच्या प्रमाणपत्रा ऐवजी त्यांनी त्याचे अनधिकृत केलेले बांधकाम नियमित करुन घेतले पाहिजे. ज्यांनी तिकडे घर विकत घेतली ते गोरगरिब लोक आहेत. त्यांना पाण्याचे कनेक्शन दिले नाही. टॅक्स लागला नाही ती पालिकेची चूक आहे. टॅक्स लावत का नाही. असे कितीतरी बांधकाम केलेले ते विकासकाचे प्रमाणपत्र वापरुन ते नियमित करता आले असते. ते त्यांनी केलेले नाही. त्या लोकांना फसवण्यामध्ये पालिकेचाही सिंहाचा वाटा आहे. पालिका सुध्दा कारणीभूत आहे जे गोरगरिब लोकांचे शाप आपल्याला लागणार आहेत हे काम आपल्याला करुन घेतले पाहिजे. हा विषय गिते साहेबांच्या समोर मांडला होता. त्यांनी शासनाला पूर्ण बुकलेट बनवून पाठवून दिली आहे. सध्या तो विषय मंत्रालयात ज्यूडिशियल डीपार्टमेंटमध्ये आहे ह्याला कारण हेच होते. आता त्याला बोलवून घ्या नाहीतर ते

त्याला दिलेले आहे. विकासकचे प्रमाणपत्र त्यांनी टी.डी.आर विकला आहे. ही माहिती आहे. त्याने नियमित करुन घेतले नाही म्हणजे प्राप्त झालेला टी.डी.आर ला इन कॅश केले आहे. त्याने त्याची रोकडी केली लोकांची अजून फसवणूक करत आहे. अशा व्यक्तिला तुम्ही तुमच्या स्तरावर बोलवा. त्याला सांगा दिलेल्या विकासक प्रमाणपत्राचा वापर रितसर कर. नाहीतर मी रद्द करीन. साहेब ह्याच्या अगोदर आमची मांग होती ज च्या माध्यमातून विषय आणला होता तेव्हा मी मागणी केली होती की हे रद्द करुन घ्या. कारण एकच आहे बरेच लोक येतात जाने दो छोड दो. क्यों इतना पकड के बैठे हो। माझी भुमिका स्पष्ट आहे त्या इमारतींना नियमित करुन घ्या. कारण त्याच्यामध्ये गोरगरिब जनता राहते आर्थिक परिस्थिती दुर्बल असलेले लोक एवढ्या लांब जाऊन राहतात. २५ लाख ३० लाखाचा फ्लॅट वन रुम किचन बेडरुमचा विकलेला आहे. साहेब माझी तुम्हाला हात जोडून विनंती आहे ह्या विषयाला तुम्ही तरी निकाल लावून द्या. हा प्रश्न मुद्दाम ह्या कारणासाठी आणला होता ह्याच्यापलिकडे माझा दुसरा कोणताही उद्देश नाही. धन्यवाद. मा. महापौर मॅडम मागच्या दोन सभांमध्ये हा विषय चालवला आहे मी आपले आभार मानतो.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्न क्र. ६ अनिल सावंत ह्यांनी विचारलेला प्रश्न आहे.

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम ह्या महानगरपालिकेमार्फत ज्या-ज्या ठिकाणी एस.टी.पी. येते तेथे एस.टी.पी. विशेष स्वच्छता कर हा लावण्यात आलेला होता. त्याबद्दल मी माहिती मागवली होती. २००१-०२ ते सन २०१०-११ ह्या कालावधीमध्ये हा विशेष स्वच्छता कर लावण्यात आलेला आहे. ह्याच्यामध्ये कुठे लावला ती माहती दिलेली नाही. मला वाटते पूर्वी शहरामध्ये न लावता शांतीनगर सृष्टी आणि जेसल पार्क ह्या तीन ठिकाणी तो लावला होता. परंतु २००७-०८ पर्यंत हे जे एस.टी.पी. होते त्याची पूर्ण देखभाल दुरुस्ती ते कॉम्पलेक्स करत होते. महानगरपालिकेचा काही रोल नव्हता. महापालिकेने हार्ड ओव्हर सुध्दा करुन घेतलेले नव्हते ते एस.टी.पी. प्लॅन्ट त्या ठिकाणचे बिल्डर्स त्या ठिकाणचे रहिवासी ते पूर्ण भेदभाव एस.टी.पी. प्लॅन्टचे करत होते. असे असताना सुध्दा ह्या लोकांनी २००१ ते २००८-०९ पर्यंत हा जो टॅक्स लागू होता संकुलनवर तो हक्क पोहचत नव्हता. कारण ते प्लॅन्ट टेक ओव्हर केलेलेच नव्हते. पूर्ण त्याचे नियोजन त्या संकुलनचे बिल्डर त्या संकुलनचे रहिवासी करत होते. तरी सुध्दा हा त्यांनी टॅक्स कसा लावला हा माझा प्रश्न आहे. त्याचे उत्तर मी मागितले होते. ते त्यांनी दिलेले नाही आणि ह्याच प्रश्नामध्ये मी एक विचारले होतं की हा विशेष स्वच्छता कर लावल्यानंतर मलप्रवाह करचे दुसरे कर लावण्यात आला. हा कर कट करुन मलप्रवाह कर लावण्यात आला. हा मलप्रवाह कर का लावण्यात आला तर ह्या शहरामध्ये जे अंडर ग्राऊंड सिव्हरेज सिस्टम निघणार आहे. त्याचा लाभ नागरिकांना होणार आहे म्हणून आज विशेष स्वच्छता कर लावण्यात आला. पण आज परिस्थिती काय आहे. भाईंदर ईस्ट, राई, मुर्धा, मोर्वा, उत्तन, डोंगरी ते पूर्ण परिसर ह्या ठिकाणी अजूनपर्यंत अंडर ग्राऊंड सिव्हरेजचे काम सुरुवात ही झालेली नाही. तरी सुध्दा आज आपण ह्या अन्यायकारकरित्या त्या लोकांजवळून टॅक्स कलेक्ट करतो. माझी आपल्याला प्रस्तावाच्या माध्यमातून एवढीच मागणी आहे की २००१-०२ ते २००७-०८ जोपर्यंत पालिकेने टेक ओव्हर केलेला नाही तो एस.टी.पी. प्लान आणि आजा जो भाईदर ईस्ट किंवा राई, मुर्धा, मोर्वा आणि उत्तन परिसर त्या पुढची गाव सर्व ज्या ठिकाणी आज अंडर ग्राऊंड सुध्दा सिव्हरेज सिस्टमचे काम सुध्दा चालू नाही आणि ते पाच वर्षात होईल अस मला वाटत नाही. ह्याला जो अन्यायकारकरित्या लावलेला टॅक्स आहे त्याची पूर्ण फेरतपासणी करुन ज्या लोकांना ह्याचा फायदा पोहचलेला नाही किंवा येणाऱ्या काही काळामध्ये पोहचणार नाही त्याला रियूज करण्यात यावे अशी माझी मागणी आहे ह्या प्रश्नाच्या माध्यमातून.

**मा. उपमहापौर :-**

सावंत साहेब तुमच्या माहितीसाठी मी त्या परिसराचे प्रतिनिधीत्व केलेले आहे. शांती स्टार परिसर शांती नगरमध्ये मी तीन टर्म तिथले प्रतिनिधीत्व केलेले आहे. १४ रुपये ७५ पैसे प्रति स्क्वेअर फुट शांती स्टार बिल्डर हा त्यांच्याकडून सर्व रहिवाशांकडून चार्ज वसूल केला त्यावेळेला ५ एम.एल.डी. पाणी एम.आय.डी.सी. कडून तो घेत होता आणि मलःनिसारण प्रवाह तेच हाताळत होते. जेव्हा येणारा पाणी दीड एम.एल.डी. च्या वरती येत नाही हे लक्षात आल्यानंतर आमचे तत्कालीन नेते मुजफ्फर हुसेन साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही तेव्हा प्रयत्न केले आणि ही स्किम ५ एम.एल.डी. पाणी महानगरपालिकेला हॅन्ड ओव्हर केले. आणि महानगरपालिकेमार्फत पाणी द्यायला सुरुवात केली. ॲज वेल ॲज त्यावेळेला आपण सिव्हरेज ट्रीटमेन्ट प्लान पण आपल्या ताब्यात घेतला आणि शांती स्टारचा जो मलप्रवाह कर तो लावायचा सगळ्या प्रकारचे कर इनफॅक्ट स्ट्रीट लाईट पण आपण ताब्यात घेतली.

**अनिल सावंत :-**

माझ्या माहितीप्रमाणे २००७ च्या नंतर घेतली.

**मा. उपमहापौर :-**

२००१ ला घेतली. ह्याची मिटींग खवाळे साहेबांकडे मंत्रालयात झाली होती. ते पाणी पुरवठाचे त्यावेळेला सचिव होते.

**अनिल सावंत :-**

माझ्या माहितीप्रमाणे २००७-०८ ला मीच मागणी केली होती. डबल टॅक्स पेमेन्ट करीता प्रॉपर्टी टॅक्स बिल्डरला पण देतात आणि पालिकेला पण देतात.

**प्र. नगरसचिव :-**

प्रश्नोत्तराची वेळ संपली आहे. महासभेसाठी चार लक्षवेधी आलेल्या आहेत. पहिली लक्षवेधी सौ. स्नेहा शैलेश पांडे ह्यांची दुसरी शर्मिला गंडोली, तिसरी अनिल सावंत आणि चौथी प्रभात पाटील ह्यांची चारही लक्षवेधी मी मा. महापौरांना सुपुर्द करतो.

**मा. महापौर :-**

सौ. प्रभात पाटील ह्यांची लक्षवेधी घ्या.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम सभागृह में लक्षवेधी पढके सुनाई जाए। क्या विषय है सबको मालूम पडना चाहिए।

**निलम ढवण :-**

विरोधकांनी महत्वाचे विषय उचलून धरले आहेत. त्यांना आपण संधी दिली पाहिजे. कारण तेही तेवढेच महत्वाचे आहेत.

**मा. महापौर :-**

विषयपत्रिकेमध्ये दोन विषय आले आहेत. उत्तन घनकचरा आणि फेरिवाला पण येणार आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम लक्षवेधी पढके सुनाओ।

**मा. उपमहापौर :-**

तुमचा विषय विषयपत्रिकेवर आहे तेव्हा तुमच्या लक्षवेधीवर चर्चा होईल. बायो मायनिंग कचऱ्याचा विषय आहे त्याच्यावर चर्चा होईल. मा. महापौरांनी त्यांची लक्षवेधी मंजुर केली आहे त्यांना बोलू द्या त्या उभ्या आहेत.

**शर्मिला बगाजी :-**

लक्षवेधी घेण्याचा अधिकार मा. महापौरांना आहे. त्याच्याबद्दल वाद नाही. बायो मायनिंगचा विषय घेतला आहे ही पण सत्य परिस्थिती आहे. परंतु जेव्हा विषय येतो तेव्हा तुमच्याकडून आदेश दिले जातात की तुम्ही त्या विषया संदर्भातच बोला. विषयाला सोडून काही बोलू नका. ते आदेश देऊन गप्प केले जाते.

**मा. महापौर :-**

तुमचा विषय आहे तुम्ही बोलू शकता.

**शर्मिला बगाजी :-**

ठीक आहे विषयाच्या वेळेला बोलायची परवानगी द्या. अन्यथा त्या विषयाच्या संदर्भात निषेध करतो असे मी आतापासून व्यक्त करते.

**मा. उपमहापौर :-**

तुम्हाला वेळ मिळेल.

**प्रभात पाटील :-**

लक्षवेधी स्विकारल्याबद्दल धन्यवाद. लक्षवेधी वर बोलायच्या अगोदर त्याची पार्श्वभूमी सांगते ह्या संदर्भामध्ये महानगरपालिकेच्या शाळा आणि त्यांची माहिती मागवण्याबाबत मी ५ फेब्रुवारीला पत्र दिले होते. त्याचे एक महिन्यांनी उत्तर आले नाही. म्हणून मी एक महिन्यानंतर पवार साहेबांना रिमायंडर दिले तरी उत्तर आले नाही त्याच्यानंतर पवार साहेबांना ३-४ वेळा फोन केले मधल्या काळात ते विसरले होते. त्याचे उत्तर मला ११/०४ ला म्हणजे २ महिन्यानंतर आले. एकंदर प्रशासनाचा कारभार आपल्या निर्दशनाला आणू इच्छिते त्याच्या नंतर दुसरी गोष्ट मला प्रशासनाच्या बाबतीत बोलायची आहे की महानगरपालिकेचा कारभार हा स्वच्छ मराठीतून व्हावा असे शासनाचे निर्देश आहेत. मराठी राज्य महाराष्ट्र राज्य आहे. मराठी भाषा आहे आपल्या राज्याची असे असताना संपूर्ण पालिकेचे उत्तर इंग्रजीमधून आहे. ही गोष्ट सुध्दा आपण ध्यानात घेतली पाहिजे की आपण कुठे चाललो आहोत. तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे

चार दिवसांपूर्वी मी आयुक्तांना भेटले तेव्हा सांगितले ज्या दिवशी मला उत्तर मिळाले नाही मी भेटायला गेले होते. त्या दिवशी एका वृत्तपत्रामध्ये बातमी होती की आपण ज्या शिक्षकाला आहे त्याला आपण निलंबित केले. भ्रष्टाचारामध्ये काही पकडताना कोणाची तरी बदली होताना आपले शिक्षण अधिकारी देशमुख आहेत. त्यांचबरोबर खूप ठिकाणी डायसवर असतो. ज्याला आपण निलंबित करतो त्याचे निलंबन आजही आहे. त्याला आपण सेवेत घेतले नाही. तो माणूस पुढे जाऊन डायसवर बसतो ही ह्या शहराची शिक्षणाची शोकांतिका आहे. आणखी एक माणूस निलंबित झाला होता. ही दोघ माणसे ह्या देशमुखबरोबर फिरत असतात त्यांचे दोन हात असल्यासारखे. शहरामध्ये काय काम करतात माहित नाही. आवळ्याकडे वर्ग आहे हे ही लक्षात घ्या. त्यांना वर्ग आहे. त्या वर्गात कधीही प्रेझेन्ट नसतात. एकंदर मला सांगायचे आहे मी ह्या गोष्टी आपल्या निदर्शनास आणल्या. मिरा भाईंदरमध्ये ज्या शाळा आहेत त्या हिंदी, मराठी किंवा आणखी कोणत्या असो. त्याचा शैक्षणिक दर्जा काय आहे ते सभागृहाला सांगायला नको. कारण नेहमी चर्चा होते ७ वी नंतर, ८ वी मध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचे काय हाल होतात आणि ८ वी मध्ये खाजगी शाळेत गेल्यानंतर त्या खाजगी शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर शिकत असताना काय अडचणी येतात कारण त्यांना तिथपर्यंत वाचता देखील येत नसते. हे सगळे जिल्हापरिषद, नगरपालिका, महापालिका शिक्षकांचे आपण लाखोंनी खर्च करतो. बजेट काढून बघितले तर बजेटमध्ये लाखोंनी तरतूद केली आहे. शिक्षकांचे पगार एवढे अवाढव्य जातात त्यांना दिलेला अधिकार आहे पण त्या शिक्षकाच्या पगाराचा परिपाक निघाला पाहिजे. तो परिपाक तुम्हाला आणि आम्हाला नको आहे. फक्त ते विद्यार्थी घडवण्यासाठी पगार घेतात. आजचा विद्यार्थी उद्याचा सुजाण नागरिक आहे. आपण त्या विद्यार्थ्यांच्या नावावर पगार घेतो. त्या विद्यार्थ्यांचे आपण देण लागतो. आपण घडवणारे शिल्पकार आहोत. शिक्षक हा कायम शिल्पकार आहे. पुढची पिढी घडवण्याचे महत्वाचे काम तो करत असतो. तो काय काम करतो ह्या विषयावर मी बोलणार नाही. सध्याच्या परिस्थितीत मी एवढेच बोलणार आहे आज ही विद्यार्थ्यांची दयनिय अवस्था आहे. मातृभाषेतून शिकताना आजची परिस्थिती सामाजिक परिस्थिती अशी आहे की आता मातृभाषा संपलेली आहे आणि सगळीकडे इंग्रजीचे पेव फुटलेले आहे. आज अगदी रस्त्यावर झाडू मारणारा माणूस मी कमी मानत नाही. कमी लेखत नाही. घरकाम करणारी, धूणीभांडी करणारी बाई आपल्या मुलाने इंग्रजी माध्यमातून शिकावे म्हणून आणखी चार घरची कामे वाढवून घेते. आपल्या मुलाने इंग्रजी माध्यमातून शिकावे अशी तिची अपेक्षा असते. शेवटी प्रवाहाबरोबर जाणे त्यातच शहाणपण असते. प्रवाहाच्या विरुध्द कोणी चालायला बघत नाही. त्यांच्या इच्छा काही गैर नाहीत. परंतु इंग्रजी माध्यमातील शाळांची फी, ट्यूशन फी आणि शाळेची फी आणि एकंदरीत वरचा खर्च हा सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा नाही. गरिबांना तर अजिबातच नाही. आपल्या शाळेमध्ये येणारी मूल ही पूर्णपणे गरिब आहेत. म्हणून ते आपल्याकडे येतात. अशा परिस्थितीत आपण त्यांना करोडो रुपये खर्च करतो. मातृभाषेतून लिहिता वाचता येत नाही अशी आपली परिस्थिती आहे. मला ह्या लक्षवेधीच्या माध्यमातून एक गोष्ट निर्दशनास आणायची आहे की आपल्याला मातृभाषा टिकवायचीच आहे. कारण मातृभाषेमधून मुलाच डेव्हलपमेन्ट मूलांचा विकास जितक्या वेगाने आणि जितका चांगला होतो तितका अन्य भाषेतून समजायला बराच काळ जातो. मग त्याच्यानंतर त्यांचा विकास होतो. मला एवढे म्हणायचे आहे की त्या शाळेमध्ये आपण काही प्रयोग केले पाहिजे आणि हे लक्षात घ्या प्रयोग करणे म्हणजे गुन्हा करणे नाही. कोणत्याही शैक्षणिक बाबतीत आजपर्यंत प्रयोगच झाले आणि ह्या प्रयोगातूनच शिक्षणाचा विकास होत गेला. आपण काही प्रयोग करणे अपेक्षित आहे. ब-याच महानगरपालिका आहेत. ठाणे महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका ब-याच महानगरपालिकांनी असे निर्णय घेतले की त्यांनी काही ठराविक ठिकाणी इंग्रजी माध्यमाचे वर्ग चालू केले. काही जणांनी डोक्यामध्ये शंका डोकावली की मुंबई महानगरपालिका अधिनियम वापरतो. आपल्या महानगरपालिकेला ते अधिनियम वापरणारे इतरही महापालिका आहेत. त्यांनीही निर्णय घेतले आहेत. इंग्रजी माध्यमाचे काही वर्ग त्याच्याकडे चालू केले. काही महानगरपालिकेने सेमी इंग्रजी वर्ग चालू केले. ह्या शहरामध्ये अनेक बिल्डर आहेत, अनेक उद्योजक आहेत, दानशूर व्यक्ती आहेत की ते आपले २-४ वर्ग पालकत्व घ्यायला तयार आहेत. त्यांना ते वर्ग द्या ते त्या मुलांचा विकास करत असतील तर त्यांची एक सभा घ्या. त्यांना बोलवा त्यांना देऊन टाका. अनेक दानशूर व्यक्ती आहेत. ह्या क्षेत्रामध्ये काम करणारे अनेक व्यक्ती आहेत. ज्यांना शिक्षणामध्ये इंटरेस्ट आहे, रस आहे. ह्या मूलांच्या भवितव्याचा विचार आहे ते लोक तुमचे दोन वर्ग घ्यायला कधीही नाकारणार नाही. सत्ताधारी म्हणून माझी लक्षवेधी घेतली मी तुमचे पण आभार मानते. ह्याचे कारण असे आहे की जर आपण आज ह्या लक्षवेधीवर विचार केला नाही तर जुन महिना जवळ आहे. कदाचित राहिलेल्या दोन महिन्यामध्ये तुम्ही हा निर्णय घेतला तर येणाऱ्या जूनमध्ये आपण शैक्षणिक वर्षामध्ये काही नविन निर्णय घेऊ शकू आणि चालू सुध्दा करु अन्यथा आपले वर्ष पुन्हा फुकट जाणार आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या सुचनांचा विचार केला जाईल. शहरातील ९४ खाजगी शाळांमध्ये २५ टक्के आपल्याला प्रवेश आर.टी.ई. च्या माध्यमातून आर.टी.ई. मध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना विशेष विनंती की आर.टी.ई. मध्ये काम करा तर ह्यांना आपल्या नगरभवनच्या कार्यालयातून प्रवेश मिळतील तसाच आमचा एक प्रयत्न आहे की वेगवेगळ्या कार्यालयामध्ये किंवा शाळांमध्ये अधिकृत केंद्र सुरु करायची ज्या योगे त्यांना शिक्षण घेता येईल. आपल्या महानगरपालिकेच्या परिसरातील विद्यार्थ्यांची ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यांना देखील शहरातील नामांकित ९४ शाळांमध्ये प्रवेशाची व्यवस्था आपल्याकडून सुरु आहे. आपल्या शाळांमध्ये जे अमुलाग्र बदल झाले आहेत. त्यात बऱ्याच शाळांमध्ये डिजीटल शाळांचे प्रयोग देखील सुरु आहेत. आदिवासी परिसरात असलेल्या चेण्याच्या शाळेमध्ये देखील आपण डिजीटल शिक्षणाची सुरुवात केली आहे.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम ताईचा विषय खूप चांगला होता. लक्षवेधीला आमचा विरोध नव्हता परंतु हे पण विषय घ्यावे अशी अपेक्षा होती. म्हणून आम्ही बोललो ताईंनी जो अवाढव्य फी गोरगरिब मुलांना जी शिक्षणाच्या वेळी लावली जाते. त्याचवेळी डोनेशन हा एक प्रकार आहे. शासनाने ह्यापूर्वीच डोनेशन घेण्यावर बंदी घातली होती. परंतु खाजगी शाळा ज्या आहेत त्या अवाढ्य डोनेशन घेता. त्यामुळे गोरगरिब लोकांना त्यांच्या फॅमिलीत दोन मूल असतील तर त्यांना शिक्षण देताना कठीण जाते. जे शासनाने निर्बंध घातले आहेत. अजूनही खाजगी शाळा अवाढ्य डोनेशन घेतात. त्यावर आपल्या प्रशासन किंवा पालिकेमार्फत आपण काय करणार आहोत. त्याला निर्बंध घालणे जरुरी आहे.

**मा. महापौर :-**

जैसे अभी उपमहापौर ने बोला जैसे २५ टक्के अपने..............

**निलम ढवण :-**

पालिकेच्या शाळा ज्या आहेत............

**मा. उपमहापौर :-**

हे जे सांगितले ना ते प्रवेश खाजगी शाळांसाठी आहेत. ते २५ टक्के प्रवेश आपण देऊ शकतो. तो आपला अधिकार आहे.

**निलम ढवण :-**

साहेब तुमचे म्हणणे बरोबर आहे की २५ टक्के परंतु शासनाने.

**मा. उपमहापौर :-**

हा राज्य सरकारने दिलेला अधिकार आहे. ह्याचा राजपत्रित अधिकार आहे.

**निलम ढवण :-**

डोनेशन घेण्यासंदर्भात मी बोलते शासनाने शिकण्यासाठी सक्ती करतात. त्यावेळी त्या मुलांना डोनेशनची जबरदस्ती होऊ नये आणि खाजगी शाळांमध्ये जास्त डोनेशन घेतली जातात. त्याच्यावर पहिली बंदी आणा.

**मा. उपमहापौर :-**

ज्या सर्व शाळा आहेत ते आपले अधिकार नाहीत त्या प्रायव्हेट शाळा आहेत.

**निलम ढवण :-**

प्रायव्हेट शाळा असल्या तरी शासनाने काही तरी नियम घालून दिले आहेत ना.

**मा. उपमहापौर :-**

ह्या संदर्भात शिक्षण उपसंचालकाकडे आपली तक्रार देऊ आणि ह्या संदर्भात काय काय कारवाई करता येईल.

**निलम ढवण :-**

महानगरपालिकेच्या क्षेत्रात असलेल्या खाजगी शाळांवर आपण अंकुश ठेऊ शकतो ना.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या शिक्षण खात्यांना ते अधिकार नाहीत.

**निलम ढवण :-**

मग त्यांनी डोनेशन घ्यावे का?

**स्नेहा पांडे :-**

मा. महापौर मॅडम महासभा में ऐसा ठराव हुआ की शिक्षण संस्था में ५० टक्के टॅक्स माफ किया जाए। अगर उनके उपर बंदीश नही ला सकते डोनेशन लेते है। मनमानी बठाके रखते है तो उनको टॅक्स

में छुट क्यों दिया जाए। पालिका की सवलत लेंगे और पालिका के किसी नियम कानून फॉलो नही करेंगे। तो कैसा होएगा। फिर हम उनको टॅक्स कम करके क्यों दे।

**गिता जैन :-**

आर.टी.ई., सी.बी.एस.सी., आय.सी.एस.सी. सभी बोर्ड पे लागू होगा या एस.एस.सी. बोर्ड पे लागू होगा। क्योंकी सी.बी.एस.सी. स्कूल यूज्वली आर.टी.ई. के बच्चो को नही लेते।

**मा. उपमहापौर :-**

त्या शाळेची यादी आपल्याकडे आहे.

**गिता जैन :-**

ती यादी मी बघितली पण आपण का करु शकत नाही.

**मा. उपमहापौर :-**

आपण तो प्रयत्न करु.

**धृवकिशोर पाटील :-**

हे महाराष्ट्र गर्व्हमेंटचे जी.आर आहेत. त्या अनुषंगाने जे अव्हेलेबल होईल ते आपल्या मिरा भाईंदरच्या विद्यार्थ्यांसाठी करु.

**प्र. नगरसचिव :-**

२ के अन्वये एक प्रस्ताव आलेला आहे.

**जुबेर इनामदार :-**

गोषवाऱ्यासहित द्या.

**प्र. नगरसचिव :-**

गोषवारा तुम्हाला मिळेल.

**मा. उपमहापौर :-**

सचिव साहेब प्रशासनाकडून आलेला गोषवारा आहे आणि आपल्याला के मध्ये तो प्रस्ताव दाखल करुन त्याचा गोषवारा दोन दिवसात पोहोचेल.

**धृवकिशोर पाटील :-**

गोषवारा रेडी आहे. महाराष्ट्र सरकारने आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेला ५ करोडचा विशेष निधी दिलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

जी.आर आहे.

**जुबेर इनामदार :-**

मूलभुत सुविधा आली आहे का?

**धृवकिशोर पाटील :-**

तुम्हाला विरोध करायचा आहे का? विशेष निधीला विरोध करायचा आहे का? मिरा भाईंदरच्या विकासासाठी पाच कोटी दिले आहेत ना.

**जुबेर इनामदार :-**

गोषवारा द्या.

**धृवकिशोर पाटील :-**

गोषवारा देतो गोषवारा रेडी आहे. गोषवारा पाच मिनिटांत मिळेल तुम्ही फक्त हा विषय मंजूर करा.

**प्र. नगरसचिव :-**

ह्या प्रकरणाला सभागृहाची मान्यता असेल तर लगेच गोषवारा मिळणार आहे.

**अनिल सावंत :-**

विषयपत्रिकेवर विषय आणा.

**मा. महापौर :-**

पुढचा विषय घ्या.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ०१, **दि. ०८/११/२०१७ व दि. ०८/१२/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**राकेश शहा :-**

पेज नं. १९

**गणेश भोईर :-**

त्यावर सुचना बाकी आहे.

**रोहिदास पाटील :-**

दि. ०८/११/२०१७ व दि. ०८/१२/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव मंजूर करण्यांत येत आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

**दि. ०८/११/२०१७ व दि. ०८/१२/२०१७ रोजींच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.**

**ठराव क्र. ०१ :-**

दि. ०८/११/२०१७ व दि. ०८/१२/२०१७ रोजींच्या मा. महासभांच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या सुचना व दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम एक विषय आहे इंदोर महानगरपालिकेमध्ये आपल्या समवेत.............

**जुबेर इनामदार :-**

बायो मायनिंगचा विषय आहे तेव्हा आपण चर्चा करु.

**धृवकिशोर पाटील :-**

तुमचे अभिनंदन करण्याचा ठराव मांडतो. मा. महापौर मॅडम इंदोरला विरोधी पक्षनेते, गटनेते जबेर इनामदार, आमगावकर गटनेते शिवसेना...........

(सभागृहात गोंधळ)

**शर्मिला बगाजी :-**

मा. महापौर मॅडम विषयावर.

**मा. उपमहापौर :-**

आपण प्रस्ताव मांडला आहे त्याचा तो विषय आहे.

**धृवकिशोर पाटील :-**

सभागृह नेते रोहिदास पाटील आणि गटनेते हसमुख गेहलोत आणि आपले पानपट्टे साहेब आपण इंदोर महानगरपालिकेमध्ये गेलो होतो. त्या महानगरपालिकेमध्ये गेल्यावर तिकडची साफसफाईची सिस्टम बघितली. घनकचरा प्रकल्प बघितला. आपण सगळ्यांनी व्यवस्थित अभ्यास केला.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

विषयाला धरुन बोला.

**मा. उपमहापौर :-**

अहवाल सादर केला त्याची माहिती.

**शर्मिला बगाजी :-**

ह्या विषयावर लक्षवेधी फेटाळली मग विषयाला धरुन बोला.

**निलम ढवण :-**

विषयाला धरुन स्थानिक नगरसेविकेला बोलू दिले नाही.

**मा. उपमहापौर :-**

मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की त्यांनी अहवाल काय सादर केला इंदोर महानगरपालिकेमध्ये ४० देशाचे प्रतिनिधी आले होते.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

मी हा विषय ह्यासाठी काढला होता की ह्या महानगरपालिकेची नगरसेवकांची बदनामी होते. वृत्तपत्रामध्ये अभ्यास दौऱ्याच्या निरनिराळ्या बातम्या आल्या आहेत आणि ह्या अभ्यास दौऱ्यामुळे किती नुकसान होते ते आले आहे. मा. महापौर मॅडम सर्व नगरसेवकांची मागणी होती की बरेच नगरसेवक नविन आलेले आहेत. ह्या नविन नगरसेवकांना प्रशिक्षणासाठी................

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

अभ्यास दौऱ्याविषयी अनिल सावंत ह्यांचे पत्र आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम जे लेटर दिले आहेत अभ्यास दौऱ्यासंदर्भात विषय आहे का विषयपत्रिकेवर? मला मा. महापौरांनी उत्तर द्यावे.

**मा. उपमहापौर :-**

तुमच्या गटनेत्यांचे पत्र आहे.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

विषयपत्रिकेवर विषय घ्या त्यानंतर हा विषय घ्या. विषयावर चर्चा करा.

**मा. उपमहापौर :-**

इनामदार साहेब हा विषय राजकारण करण्याचा नाही. शहराची बदनामी करता. तुमची पत्र तर आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**जुबेर इनामदार :-**

अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आलेली डोळ्यासमोरची महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला गेलेल्या महानगरपालिकेची परिस्थिती बघितल्यानंतर हा विषय आमच्या पक्षांनी सेनानी स्पष्ट उत्तर दिले की जायचे नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

हा विषय शेवटी घ्या.

**दिपीका अरोरा :-**

धृवकिशोरजी हमको भी इन्फॉर्मेशन चाहिए।

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

मा. महापौर मॅडम माझ्या नावाचा उल्लेख केला आहे. सचिव साहेब ते पत्र काढा.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

पत्र कधी दिले.

**प्र. नगरसचिव :-**

सचिव विभागाकडून सर्व सदस्यांना मार्चमध्ये विचारले त्या अनुषंगाने पत्र आहे.

**अनिल सावंत :-**

दौरा कधीचा होता.

**प्र. नगरसचिव :-**

तुमच्या पत्रामध्ये उल्लेख आहे.

**अनिल सावंत :-**

२० एप्रिल.

**प्र. नगरसचिव :-**

२० ते ३० च्या दरम्यान.

**अनिल सावंत :-**

तो दौरा झाला.

**मा. उपमहापौर :-**

तुमचे दौऱ्याबद्दलचे वक्तव्य आहे.

(सभागृहात गोंधळ)

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम पत्र कधी दिले ते महत्वाचे नाही का दिले ते महत्वाचे आहे.

**अनिल सावंत :-**

सचिव साहेब दौऱ्यासाठी कधी पत्र दिले.

**मा. उपमहापौर :-**

पत्र तुमचेच आहे वाचा.

**अनिल सावंत :-**

हे पत्र रद्द झाले आहे. नंतर कन्सन कधी घेतले.

**प्र. नगरसचिव :-**

एप्रिलच्या सुरुवातीला.

**अनिल सावंत :-**

त्याच्यात माझे अप्रूव्हल आले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

एकच अप्रूव्हल आहे.

**अनिल सावंत :-**

मी दुसरे पत्र दिले आहे.

**मा. उपमहापौर :-**

तुम्ही दुसरे पत्र द्यायचे होते.

**अनिल सावंत :-**

आम्ही दुसरे पत्र दिले आहे. एप्रिलमध्ये सचिव साहेब तुम्ही उपमहापौरांची दिशाभूल करु नका. आमचा विरोध आहे आणि राहणार.

(सभागृहात गोंधळ)

**दिपिका अरोरा :-**

दिशाभूल तुम्ही करता दौऱ्याला जाता आणि परत सांगता दौरा कॅन्सल करा.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम आपण सन्मा. सदस्यांचे.......

**जुबेर इनामदार :-**

महानगरपालिकेत ठेवा.

**दिपिका अरोरा :-**

तुम्ही इंदोरला का गेले.

(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

गटनेते तुम्ही दौऱ्याचे पत्र दिले आहे. आता आपण इथे प्रशिक्षण देऊ.

**दिनेश जैन :-**

गटनेत्यांचा विरोध होता तर इंदोरला का गेले.

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौर मॅडम आपण सर्वांचे ऐकून घेतले सन्मा. सदस्यांचे पण ऐकले. ज्यांनी पत्र दिले मला पत्रकार बंधूना पण विनंती करायची आहे. मिरा भाईंदर शहराचे सर्व नागरिक पण आले आहेत. आपण

सगळ्यांनी बघितले गेले ३-४ दिवस झाले वर्तमानपत्रात बातम्या होत्या की बी.जे.पी. चे जे सत्ताधारी आहेत त्यांनी पिकनीक ऑरगनाइज केली. आता ह्यांचे पितळ उघडे पडलेले आहे.
(सभागृहात गोंधळ)

**अनिल सावंत :-**

तुमचे पितळ उघडे पडले आहे.

**मा. उपमहापौर :-**

पत्रकार सकाळी फोन करतो आणि विचारतो अरे दौऱ्याला जाणार आहेस का? बातमी देतो मी.
(सभागृहात गोंधळ)

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम ज्या दौऱ्याबाबत ह्या सभागृहात जो गाजावाजा होतो. किमान ८ दिवस वृत्तपत्र गाजत होती. भाजप वाल्यांना जायचे आहे. शहरावर इतका बोजा टाकला. मला वाटते जुबेर, अनिल गेली कित्येक वर्ष नगरसेवक आहेत आपण. कित्येक वेळा दौऱ्याला गेलो. ठीक आहे आता तुम्ही मुद्दा उपस्थित करता की करवाढ केली हे वाढ केली ती वाढ केली. अदांजपत्रकात हा एक हेड असतो आणि तो हेड आपण परिपूर्ण करतो. दौऱ्यावर जाण्याचा उद्देश प्रशिक्षण देणे, प्रत्येक पाच वर्षात नविन सदस्य येतात. आणि सर्वांत महत्वाचे दौरे आयोजित करण्या मागचा हेतू हा असतो की तिथे जाऊन ती महानगरपालिका, तिकडचे प्रशासन अभ्यास करुन येणे. जाण्या येण्यामध्ये दोन दिवस जातात. एक दिवस तिकडची महानगरपालिका जो माणूस जातो त्याला वाटते की ह्या शहरातले काही तरी वेगळे आहे ते बघावे. १९९१ पासूनच्या दौऱ्याचा मी उहापोह करते. कारण मी दौरे अटेन्ड केले आहेत. मला वाटते तुम्ही सुध्दा ते दौरे अटेन्ड केले आहेत. माईंड फ्रेश होणे हा सुध्दा त्यामागचा एक उद्देश असतो की ह्या सगळ्या कामाच्या रगाड्यातून चार दिवस निसर्गाच्या सानिध्यात जावे आणि तिकडून फ्रेश होऊन नव्या जोमाने कामाला लागावे. महिला बालकल्याणचा दौरा झाला तो निर्णय समितीचा होता. परंतु वृक्ष प्राधिकरण जे दौऱ्यावर गेले त्याचे प्रमुख आयुक्त आहेत. महिला बालकल्याणनी जरी निर्णय घेतला तरी त्यांना परमिशन देणारे आयुक्तच होते. त्यांनी सुध्दा कायद्याच्या गोष्टी बघितल्या असतील की नाही बघितल्या असतील की हा दौरा व्हावा की न व्हावा. जो आपण मुद्दा उपस्थित करत होतात. पत्रकार जे कर वाढ करत होते. हे चार प्रस्ताव महानगरपालिकेमध्ये आले होते. दोन प्रस्ताव मागे घेण्यात आले. एका प्रस्तावात असे म्हटले आहे की जो टॅक्स लागणार आहे तो मार्चपासून नसून १ एप्रिलपासून प्रस्तावित करण्यात आलेला आहे. कर वाढीचा जो बाऊ केला गेला त्याच्यात किती तथ्य होते मला माहित नाही मी कोणावर आक्षेप घेत नाही. जुबेर इनामदार आणि हरिश्चंद्र आमगावकर ह्यांनी दौरा व्हावा ह्यासाठी पत्र दिले आहे. त्यांचे १६.१२ आणि १६.१ चे पत्र आहे. संमती तुमची नव्हती अशातला भाग नाही. संमती तुमची सुध्दा होती. आपल्याला सगळ्यांना ह्या सगळ्या गोष्टीची गरज आहे. कुसुम गुप्तांनी सुध्दा एक पत्र फेसबुक माझ्या दौऱ्याचा सर्व खर्च दिप्ती भटचे एक पत्र होते की शहरामध्ये फवारणी करण्यात यावी किंवा विकास कामांना तो खर्च करावा पण त्या दौऱ्यावर गेल्या. तिकडे आपण बोट दाखवतो चार बोट आपल्याकडे असतात. ह्याच्या आधी सुध्दा दौरे अटेन्ड केले आहेत. लोकांवर कर लादला आणि आपण इकडे गेलो तिकडे गेलो. मौज करायला मजा करायला गेलो. सगळ्यांनी आयुक्तांना भेटून झाले होते दौरे रद्द करा. वृत्तपत्रात सगळ्या गोष्टी झाल्या होत्या मग आयुक्तांनी ह्या गोष्टी का मान्य केल्या मला माहित नाही. जे झाले ते होऊन गेले. पुढचा दौरा होईल की नाही मला माहित नाही. आपल्या सगळ्यांना ह्या गोष्टीची गरज आहे.

**दिप्ती भट :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते पहिले प्रभात ताई आपले धन्यवाद. त्यांनी एवढे सांगितले पण मी पत्र दिले. माझे व्यक्तिगत कारण आहे. ज्या नगरसेवकांनी दिले त्यांचे व्यक्तिगत कारण असेल त्यांनी दिले असेल. पक्षाने जे सांगितले त्या हिशोबानी दिले असेल. आपण बोलतो प्रशिक्षण व्हावे ते गरजेचे आहे. आम्ही पण बोलतो प्रशिक्षण व्हावे ते गरजेचे आहे. प्रशिक्षणासाठी असे नाही की बाहेर जावे. बाहेर जाण्यासाठी अमाऊन्ट ठेवली आहे. त्यामध्ये १०० जण तिकडे जाण्यापेक्षा त्या दोन व्यक्तींना इकडे हाऊसमध्ये बोलवून प्रशिक्षण घेऊ शकता.

**प्रशांत दळवी :-**

एवढी वर्ष हाऊसमध्ये प्रशिक्षण घेतले का?
(सभागृहात गोंधळ)

**मा. उपमहापौर :-**

ह्या सभागृहात जेवढे बसले आहेत त्यांनी छातीवर हात ठेवून सांगावे आम्ही दौऱ्याला आजपर्यंत गेलो नाही.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम प्रभात ताई किंवा उपमहापौर साहेब सांगतात की ह्यापूर्वी कोणी कधी दौऱ्याला गेले नाहीत का? ते कोणी नाकारत नाही. परंतु ह्यापूर्वीचे जेवढे दौरे झाले त्यावेळी महानगरपालिकेची ही परिस्थिती नव्हती. जी आता झालेली आहे. आता जी परिस्थिती झाली आहे की लोकांच्या आरोग्यासाठी खर्च करायला महानगरपालिकेकडे पैसा नाही. औषध फवारणी बंद केली आहे. एवढी भयानक परिस्थिती मिरा भाईंदरची पालिकेची कधीही नव्हती.

(सभागृहात गोंधळ)

**गणेश भोईर :-**

ह्यांचे नगरसेवक पत्रव्यवहार करतात की आम्हाला दौऱ्यावर जायचे आहे. मिरा भाईंदर जनतेची फसवणूक करतात.

**निलम ढवण :-**

मी आयुक्तांना विनंती करते ज्या पध्दतीने प्रभात ताईने सांगितले की तो निर्णय आयुक्तांचा होता. त्या पध्दतीने मा. आयुक्तांना साहेबांनी मिरा भाईंदर शहरातील नागरिकांसाठी ज्या अत्यावश्यक सेवा आहेत त्या ताबडतोब सुरु करण्यात याव्या.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

महत्वाचा विषय घेतला नाही. हा विषय आहे का? मिनिटे तुम्ही बोलू देत नाही. ह्या विषयावर अर्धा तास झाले बोलतात.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम प्रशिक्षणाची गरज आहे कारण सदस्यांना माहित नाही कसे बोलायला पाहिजे. वेगवेगळ्या जाती पंथाची लोक आहेत. वेगवेगळ्या प्रभागातून निवडून आले आहेत ह्या शहराचे प्रतिनिधीत्व करतो आणि ह्या महानगरपालिकेची बदनामी होते म्हणून हा विषय काढला होता. आपण गुण्या गोविंदाने काम करतो.

(सभागृहात गोंधळ)

**धृवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम महानगरपालिका बदनाम म्हणजे आपण बदनाम उद्या मी जरी बदनाम झालो तर आपण बदनाम होतो की नाही. आपले सदस्य बदनाम होतात तेव्हा आपण बदनाम होतो ही भावना ठेवली पाहिजे. नगरपरिषद असताना मी ह्या पालिकेत नगरसेवक आहे. मायरा मॅडम प्रथम महापौर होत्या. त्याच्यानंतर निर्मला सावळे झाल्या. श्री. तुलशीदास म्हात्रे कॉंग्रेसचे महापौर झाले. सगळे महापौर झाले आणि सगळ्यांनी वेगळे दौरे काढले. ह्या दौऱ्याच्या निमित्ताने सर्व नगरसेवक एकत्र येऊन आपल्या विषयांची आदान प्रधान होते. सगळे मित्र बनतात आणि ह्या महानगरपालिकेचे कामकाज चांगले होते. म्हणून आपण हा दौरा काढतो. ह्याच्यावर कोणी बदनामी करु नये. माझी सर्वांना विनंती आहे हा विषय स्टॉप करा. ह्यानंतर जे प्रताप सरनाईक साहेबांचे जे निमंत्रण भेटले अहे खूप अप्रतिम कार्यक्रम सरनाईक साहेबांनी लावले आहे आणि हे नेहमीच लावतात. त्याचे अभिनंदन सभागृहात मी करतो. आणि त्यांना धन्यवाद द्या. परंतु हे करत असताना मा. महापौर मॅडम अपल्या अधिकाऱ्यांनी आपल्यामध्ये लावालावी केली की हा जो कार्यक्रम आहे हा बाळासाहेब मैदानामध्ये केलेला आहे. आणि मागे आपण महासभेमध्ये बाळासाहेब ठाकरे उद्यानामध्ये कोणतेही कार्यक्रम करु नये असा ठराव केलेला आहे आणि ह्या ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही न करता ह्या प्रभाग अधिकाऱ्याने कार्यक्रमाला आमचा विरोध नाही ह्या मैदानामध्ये कोणतेही कार्यक्रम न होता खेळ एके खेळ झाला पाहिजे. परंतु असे न करता प्रभाग अधिकारी सुनिल यादव ह्यांनी अशी कार्यवाही केली आहे. आणि दोघांमध्ये भांडण लावले. ह्या कार्यक्रमाची गरज आहे पण ह्या प्रभाग अधिकाऱ्यांनी चुकीचे काम केले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**प्रविण पाटील :-**

विषय पटलावरचे विषय चालू करा.

**अर्चना कदम :-**

सभागृहात प्रत्येक वेळी धृवकिशोर पाटील कुठलाही विषय विषयपत्रिकेत नसताना सभागृहात आणता आणि लावालावी करता. आणि भांडण करता. आज कार्यक्रम असताना तुम्ही महासभा लावली आणि आम्ही आलो. विषय नसताना विषय घेता आणि टाईम पास करता.

**रोहिदास पाटील :-**

आज अक्षय तृतिया असल्यामुळे बऱ्याच सदस्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी जायचे असल्याने आजची सभा तहकूब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**हसमुख गेहलोत :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**सभा तहकुबी ठराव क्र. ०२ :-**

आज अक्षय तृतिया असल्यामुळे बऱ्याच सदस्यांना कार्यक्रमाच्या ठिकाणी जायचे असल्याने आजची सभा तहकूब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील       अनुमोदक :- श्री. हसमुख गेहलोत**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा तहकुब करण्यात येत आहे.

(सभा तहकुब वेळ दु. १२.५५ वाजता)

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका